श्रद्धा पवित्र; पण प्रदूषणाचे समर्थन कसे?

छटपूजा हा सूर्योपासना, निसर्गपूजा आणि जलसंवर्धनाचा संदेश देणारा अत्यंत पवित्र लोकउत्सव आहे. उगवत्या आणि मावळत्या सूर्याला अर्घ्य देत निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या सणाला भारतीय संस्कृतीत विशेष महत्त्व आहे. मात्र, श्रद्धा आणि परंपरेच्या नावाखाली याच उत्सवाच्या निमित्ताने नद्यांच्या पाण्यात प्रदूषणाची भर पडत असेल, तर हा विरोधाभास गंभीरपणे विचार करायला लावणारा आहे. सूर्याची पूजा करताना जीवनदायी नद्यांचे आरोग्य आपण धोक्यात घालत आहोत का, हा प्रश्न आज उपस्थित होणे गरजेचे आहे.



छटपूजेच्या काळात नदीकिनारे, तलाव आणि जलाशयांवर भाविकांची मोठी गर्दी होते. पूजेसाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याचे अवशेष, फुले, फळे, प्लास्टिकच्या पिशव्या, सजावटीचे साहित्य, निर्माल्य आणि अन्य कचरा अनेकदा थेट नदीपात्रात टाकला जातो. काही ठिकाणी तात्पुरत्या घाटांची उभारणी, स्वच्छतेचा अभाव आणि सांडपाण्याचा नदीत होणारा विसर्ग यामुळे प्रदूषणाची समस्या अधिक गंभीर बनते. उत्सव संपल्यानंतर घाटांवर आणि नदीकिनाऱ्यांवर साचलेला कचरा निसर्गाच्या जखमा अधिक खोल करतो.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे नदी ही केवळ धार्मिक विधी करण्याचे ठिकाण नाही. ती लाखो लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा स्रोत आहे. असंख्य जलचर, पक्षी आणि वनस्पतींचे अस्तित्व तिच्यावर अवलंबून आहे. नदीचे पाणी प्रदूषित झाल्यास त्याचा परिणाम मानवी आरोग्यापासून पर्यावरणाच्या संपूर्ण साखळीवर होतो. जलप्रदूषणामुळे पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी होणे, जलचरांचे अस्तित्व धोक्यात येणे आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

खरे तर छटपूजेचा मूळ संदेशच निसर्गाशी एकरूप होण्याचा आहे. सूर्य, जल आणि पृथ्वी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे ही या परंपरेची खरी भावना आहे. मग ज्या नदीला आपण पवित्र मानतो, तिच्यातच कचरा टाकून तिचे अस्तित्व धोक्यात आणणे, ही श्रद्धा कशी म्हणता येईल? देवाला अर्पण केलेले पूजेचे साहित्य नदीत टाकणे म्हणजे नदीची सेवा नव्हे. उलट तिच्या स्वच्छतेची जबाबदारी नाकारण्यासारखे आहे.

यामध्ये केवळ भाविकांना दोष देऊन चालणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्था, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा आणि प्रशासनाची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. उत्सवाच्या आधी नदीघाटांची स्वच्छता, कचरा संकलनासाठी स्वतंत्र व्यवस्था, निर्माल्य संकलन केंद्रे, प्लास्टिकबंदीची प्रभावी अंमलबजावणी आणि उत्सवानंतर तातडीने स्वच्छता मोहीम राबविणे आवश्यक आहे. नदीत सांडपाणी सोडणाऱ्या यंत्रणांवरही कठोर कारवाई झाली पाहिजे.

धार्मिक आणि सामाजिक संस्थांनीही यामध्ये पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. प्रत्येक घाटावर स्वयंसेवक नेमून भाविकांना पर्यावरणपूरक पूजेचे महत्त्व समजावून सांगता येईल. पूजेसाठी नैसर्गिक साहित्याचा वापर, प्लास्टिकला पूर्णविराम आणि निर्माल्याचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन यासाठी जनजागृती केली पाहिजे. श्रद्धा आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष निर्माण करण्याऐवजी दोन्हींचा सुंदर समन्वय साधणे ही काळाची गरज आहे.

आज प्रश्न केवळ छटपूजेपुरता मर्यादित नाही. गणेशोत्सव, दुर्गापूजा, धार्मिक मिरवणुका आणि विविध उत्सवांनंतरही जलस्रोतांमध्ये कचरा टाकण्याच्या घटना घडतात. सण साजरे करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; मात्र त्या उत्सवाचा पर्यावरणावर होणारा परिणाम दुर्लक्षित करण्याचा अधिकार कोणालाही नाही. धार्मिक स्वातंत्र्याबरोबरच पर्यावरणाप्रती सामाजिक कर्तव्याची जाणीवही असली पाहिजे.

नदी स्वच्छ असेल तरच तिचे पाणी जीवन देईल; अन्यथा श्रद्धेच्या नावाखाली आपण पुढच्या पिढ्यांसाठी प्रदूषणाचा वारसा निर्माण करू. छटपूजेच्या निमित्ताने प्रत्येक भाविकाने एक संकल्प करायला हवा—सूर्याला अर्घ्य देऊ, पण नदीत कचरा टाकणार नाही. पूजा करू, पण निसर्गाचे नुकसान करणार नाही.

कारण श्रद्धा ही मनाची पवित्रता असते, नदीचे प्रदूषण नव्हे! छटपूजेचा खरा सन्मान घाटांवरील रोषणाईत नाही, तर दुसऱ्या दिवशीही स्वच्छ वाहणाऱ्या नदीत दिसला पाहिजे. उत्सव संपल्यानंतरही नदीचे पाणी निर्मळ राहिले, तरच छटपूजेच्या सूर्योपासनेला खऱ्या अर्थाने पर्यावरण संवर्धनाची जोड मिळेल.

नदी वाचली तर संस्कृती वाचेल, निसर्ग वाचला तरच पुढची पिढी जगेल!



सासवड न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर

- वकील संघटनेकडून पाठिंबा
- 'समान काम, समान वेतन'च्या मागणीला ज्येष्ठ विधिज्ञ निरगुडे आणि सासवड बारचे माजी अध्यक्ष ॲड भारंबे यांचा पाठिंबा

सासवड (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आज, दि. १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारला आहे. पुणे जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या अधिनस्त सासवड तालुका न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे कर्मचारीही या संपात सहभागी झाले आहेत. माननीय उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, तसेच 'समान काम, समान वेतन' हे तत्त्व लागू करून न्याय्य वेतनवाढ द्यावी, अशी कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत बेमुदत संप सुरू ठेवण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या न्यायालयीन कर्मचारी संपाला सासवडमधील विधी क्षेत्रातूनही पाठिंबा मिळाला आहे. ज्येष्ठ विधिज्ञ निरगुडे सर तसेच सासवड बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष भारंबे सर यांनी न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या संपाला पाठिंबा दर्शविला आहे. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीच्या मागणीला विधी क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींनी पाठिंबा दिल्याने कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला नैतिक बळ मिळाले आहे. आता शासन व संबंधित न्यायालयीन प्रशासन या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते, याकडे न्यायालयीन कर्मचारी वर्गाचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

अनोळखी महिलेचा मृत्यू; ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन

शिरूर (आरंभ पर्व) : शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी शिरूर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. शिरूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत महिला अंदाजे ७० ते ७५ वर्षे वयाची असून, अंगात नेसणीसाठी मेंहदी रंगाचा पंजाबी ड्रेस, खाली लाल रंगाचा परकर, गळ्यात लाल रंगाच्या पदराच्या रंगाचा मध्यम माळा, डोक्याचे केस लांब असून दोन्ही हातांमध्ये हिरव्या रंगाच्या काचेच्या बांगड्या होत्या. तसेच डाव्या हाताच्या पोटरीवर 'राधा' असे मराठीत नाव गोंदलेले आहे. सदर महिला दिनांक १० ऑक्टोबर २०२३ रोजी पाषाणमळा, संग्राम हॉटेलच्या शेजारी, अहमदनगर-पुणे रोडच्या कडेला, शिरूर तालुका, पुणे जिल्हा येथे आढळून आली होती. महिला अंगावर पांघरून घेऊन झोपलेल्या अवस्थेत होती. तिच्या नाकातून रक्तस्राव होत असल्याचे तसेच कोणत्याही प्रकारची हालचाल नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर तिला बेशुद्ध अवस्थेत मृत स्थितीत मिळून आली. या अनोळखी मृत महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास किंवा तिच्या नातेवाईकांची ओळख पटत असल्यास शिरूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक सुधीर टेंगले यांनी केले आहे.

बुडगा जंगम समाजाचे प्रश्न मांडण्याची आमदार काळेंना विनंती

राजगुरूनगर -किरण खुडे (दै. आरंभ पर्व)



बुडगा जंगम समाजाच्या विविध प्रलंबीत मागण्यांना न्याय मिळावा, यासाठी येत्या हिवाळी अधिवेशनात प्रश्न मांडण्याची विनंती खेड- आळंदीचे आमदार बाबाजी काळे यांना समाजाच्या वतीने करण्यात आली. याविषयीचे निवेदन बुडगा जंगम समाजाच्या वतीने देण्यात आले.

याप्रसंगी 'महाराष्ट्र बेडा-बुडगा जंगम विकास संघटना' व 'अखिल भारतीय बेडा-बुडगा जंगम कल्याणकारी संघ' यांचे जेष्ठ मार्गदर्शक शरणप्पा सुर्यवंशी, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष व्यंकप्पा सुर्यवंशी, जिल्हा सचिव दिगंबर सुर्यवंशी, खेड तालुकाध्यक्ष मारूती रूद्राक्ष, उपाध्यक्ष सुर्यकांत सुर्यवंशी, सचिव राजेश सुर्यवंशी, कार्याध्यक्ष शिवाजी रूद्राक्ष, संघटक रमेश सुर्यवंशी व अशोक सुर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. बुडगा जंगम समाज अनुसूचित जातीत सामाविष्ट आहे. परंतु समाजाला जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळविताना अनेक अडचणी येत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्या सर्वेक्षण अहवालावरील कार्यवाही, चुकीच्या जात नोंदींची दुरुस्ती, शिक्षण, रोजगार, आर्थिक सहाय्य व सांस्कृतिक विकासाचे प्रश्नही प्रलंबित आहेत. या मागण्यांसह बार्टीच्या सर्वेक्षण अहवालास तातडीने मान्यता देऊन स्पष्ट शासकीय धोरण जाहीर करावे, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रक्रिया सुलभ करून गृह चौकशीच्या आधारे पात्र व्यक्तींना प्रमाणपत्र द्यावे, चुकीच्या जात नोंदी दुरुस्त करण्यासाठी राज्यव्यापी विशेष मोहीम राबवावी, विशेष मार्गदर्शक सूचना व प्रमाणपत्र वितरण शिबिरे आयोजित करावीत, युवक-युवतींसाठी कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध कराव्यात, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वसतिगृह, उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन द्यावे, मुद्रा योजना व इतर स्वयंरोजदार योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष सहाय्य करावे, सांस्कृतिक भवन व संगीत विद्यालय स्थापन करावे, पात्र वृद्ध कलाकारांना शासनामार्फत मानधन सुरू करावे, पात्र कुटुंबांना घरकुल, आरोग्य व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ द्यावा, भूमिहीन कुटुंबांना शेतीसाठी जमीन उपलब्ध करून द्यावी, समाजासाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करून आवश्यक आर्थिक तरतूद करावी. आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, आमदार काळे यांनी यावर समाजबांधवांशी सकारात्मक चर्चा करून योग्य पाऊल उचलण्याचे आश्वासन दिले आहे, असेही सुर्यवंशी यांनी सांगितले.

शशिकांत कांबळे यांना संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेसाठी निमंत्रण

पुणे (दै. आरंभ पर्व)



स्वान फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि भारती विद्यापीठाचे माजी जनसंपर्क अधिकारी शशिकांत कांबळे यांना स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या १५ व्या संयुक्त राष्ट्र व्यवसाय आणि मानवाधिकार मंचासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. येत्या २३ ते २५ नोव्हेंबरदरम्यान जिनिव्हा येथील पॅलेस डेस नेशन्समध्ये ही परिषद होणार असून, या जागतिक व्यासपीठावर कांबळे भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. कांबळे यांना यापूर्वीही संयुक्त राष्ट्रांच्या विविध परिषदांसाठी निमंत्रित करण्यात आले होते. बँकॉक, कतार, केनिया आणि सिंगापूर येथे झालेल्या परिषदांमध्ये त्यांनी भारत आणि महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. आता जिनिव्हा येथील परिषदेसाठी मिळालेले निमंत्रण त्यांच्या आंतरराष्ट्रीय कार्याचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. कांबळे यांनी भारती विद्यापीठात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करताना विद्यापीठ, विद्यार्थी, शिक्षक आणि समाज यांच्यात समन्वय साधण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यानंतर त्यांनी स्वान फाऊंडेशनची स्थापना करून शिक्षण, संस्कृती आणि नेतृत्व विकासाच्या क्षेत्रात विविध उपक्रम राबविले.

सुधारित वेतनश्रेणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा एल्गार!

बारामती न्यायालयात बेमुदत संपामुळे कामकाज ठप्प

बारामती (दै. आरंभ पर्व)



सुधारित वेतनश्रेणी तात्काळ लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यभरातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचे हत्यार उपसले असून, या आंदोलनात बारामती तालुका न्यायालयातील कर्मचारीही मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ पासून बारामती न्यायालयासमोर धरणे आंदोलन व जोरदार घोषणाबाजी करत कर्मचाऱ्यांनी संपाला सुरुवात केली.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट-क), महाराष्ट्र स्टेट ज्युडिशियल स्टेनोग्राफर्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलिफ कर्मचारी महासंघ आणि महाराष्ट्र राज्य न्यायालयीन गट-ड कर्मचारी महासंघ या चार प्रमुख संघटनांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाविरोधात हा राज्यव्यापी संप पुकारण्यात आला आहे.

माननीय उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार सुधारित वेतनश्रेणी तात्काळ लागू करावी, अशी कर्मचाऱ्यांची आग्रही मागणी आहे. 'उच्च न्यायालयाचा मान राखा, सुधारित वेतनश्रेणी त्वरित लागू करा' अशा घोषणांनी बारामती न्यायालय परिसर दणाणून गेला. या संपामुळे बारामती तालुका न्यायालयातील दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम झाला असून, न्यायालयीन कामकाज ठप्प झाले आहे. शासनाने मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत संप सुरूच ठेवण्याचा निर्धार आंदोलक कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

ग्रामीण भागातील बसशेड असून अडचण, नसून खोळंबा

- अंधार, अस्वच्छता आणि बिबट्यांची दहशत
- एसटी प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

जुन्नर -सोमनाथ साळुंके (दै. आरंभ पर्व)



ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली बसशेड आज अनेक ठिकाणी समस्यांचे आगार बनली आहेत. बसशेड आहेत, मात्र तेथे मूलभूत सुविधा नाहीत; एसटी बसेस वेळेवर येत नाहीत, परिसरात अंधार असतो, स्वच्छतेचा अभाव आहे आणि त्यातच मोकाट जनावरे व बिबट्यांची दहशत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील बसशेड म्हणजे 'असून अडचण, नसून खोळंबा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका हा छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असण्याबरोबरच डोंगरदऱ्या, जंगल आणि आदिवासी वाड्या-वस्त्यांसाठी ओळखला जातो. तालुक्यातील अनेक गावे सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये वसलेली आहेत. या भागातील कामगार, शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांना प्रवासासाठी एसटी महामंडळाच्या सेवेवर अवलंबून राहावे लागते. प्रवाशांना ऊन-पावसापासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने गावोगावी प्रमुख थांब्यांवर बसशेड उभारण्यात आल्या. मात्र, या सुविधांची देखभाल आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे चित्र दिसत आहे. अंधारात एसटीची प्रतीक्षा; प्रवाशांच्या जिवाला धोका

सध्या हिवाळ्याचे दिवस असल्याने सायंकाळी लवकर अंधार पडतो. अनेक ग्रामीण मार्गांवरील एसटी बसेस निर्धारित वेळेत येत नसल्याने प्रवाशांना तासनतास बसशेडमध्ये थांबावे लागते. मात्र, बहुतांश बसशेड परिसरात पथदिवे किंवा विद्युत दिव्यांची व्यवस्था नसल्याने प्रवाशांना अंधारातच बसची प्रतीक्षा करावी लागते. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. जुन्नर तालुका हा बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे कायम चर्चेत असतो. यापूर्वी बिबट्यांच्या हल्ल्यांत अनेकांना जीव गमवावा लागला आहे. अशा परिस्थितीत जंगलालगतच्या गावांमधील बसथांब्यांवर रात्रीच्या वेळी एकट्याने थांबणे प्रवाशांसाठी धोकादायक ठरू शकते. बसशेड परिसरात प्रकाशव्यवस्था नसल्याने बिबट्यांसह मोकाट जनावरांचीही भीती प्रवाशांच्या मनात कायम असते. अशा वेळी एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. ग्रामीण भागातील अनेक बसशेड परिसरात नियमित साफसफाई होत नसल्याने कचरा, धूळ आणि अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. साफसफाईसाठी स्वतंत्र कर्मचारी नसल्याने प्रवाशांना दुर्गंधी आणि अस्वच्छ वातावरणाचा सामना करावा लागतो. याशिवाय बसशेडसमोरून जाणारी वाहने वेगाने जात असल्याने धुळीचे प्रमाण वाढते. परिणामी प्रवाशांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

पूर्वी ग्रामीण भागातील काही बसथांब्यांवर खासगी हॉटेल आणि दुकाने असल्याने प्रवाशांची वर्दळ असायची. त्यामुळे एकट्याने थांबणाऱ्या प्रवाशांना काही प्रमाणात सुरक्षिततेची भावना मिळत होती. मात्र, आता अनेक ठिकाणी हॉटेल आणि दुकाने बंद झाल्याने बसथांब्यांवर शुकशुकाट असतो. सुरक्षा रक्षक नसल्याने रात्रीच्या वेळी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. आधीच आर्थिक तोट्याचा सामना करणाऱ्या एसटी महामंडळास प्रवाशांचा विश्वास टिकवून ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा खासगी वाहतूक सेवांकडे प्रवाशांचा कल वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. दौंड आणि भोर तालुक्यांमध्ये पीएमटीची सेवा सुरू झाल्यानंतर भविष्यात आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यांतही अशा पर्यायी वाहतूक सेवांची मागणी वाढल्यास एसटी महामंडळास आर्थिक फटका बसू शकतो.

एसटी महामंडळाने वेळीच उपाययोजना कराव्यात

ग्रामीण भागातील प्रवाशांना सुरक्षित आणि दर्जेदार सेवा देणे ही एसटी महामंडळाची जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येक बसशेडमध्ये पुरेशी प्रकाशव्यवस्था, नियमित स्वच्छता, सुरक्षित प्रतीक्षास्थळ, वेळापत्रकाची माहिती आणि आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्हीची सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण मार्गांवरील बसेसची नियमित तपासणी करून सुस्थितीतील वाहने उपलब्ध करून द्यावीत.

मोडकळीस आलेल्या एसटीमुळे प्रवाशांचे हाल

डोंगराळ भागातील वाड्या-वस्त्यांवर अनेकदा जुन्या आणि मोडकळीस आलेल्या एसटी बसेस पाठविल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत. या बसेस मार्गातच बंद पडल्याने कामावर जाणारे कामगार, विद्यार्थी आणि इतर प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. बस बंद पडल्यावर दुसऱ्या वाहनाची प्रतीक्षा करताना प्रवाशांना रस्त्यावर उभे राहावे लागते. भरधाव वाहनांमुळे अपघाताचा धोकाही वाढतो. त्यामुळे ग्रामीण भागातील मार्गांवर सुस्थितीतील बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे.

भीमा कोरेगाव विजय स्तंभाच्या रखडलेल्या स्मारकाविरोधात

१९ नोव्हेंबरपासून पुण्यात बेमुदत धरणे आंदोलन

पुणे (दै. आरंभ पर्व)

- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विजय स्तंभ भेटीच्या शताब्दी वर्षातही स्मारक कागदावरच असल्याने भीमानुयायांमध्ये तीव्र असंतोष.
- राहुल डंबाळे आणि डॉ. सिद्धार्थ धेंडे यांचा प्रशासनाला निर्वाणीचा इशारा

१८१८ च्या ऐतिहासिक लढाईत अजोड शौर्य गाजवणाऱ्या शूरवीर महार योद्ध्यांच्या गौरवार्थ मौजे पेरणे (ता. हवेली, जि. पुणे) येथे उभारण्यात आलेल्या ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजय स्तंभाचे भव्य राष्ट्रीय स्मारक तात्काळ करावे, या मागणीसाठी येत्या १९ नोव्हेंबर २०२६ पासून पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा 'भीमा-कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन समन्वय समिती'चे अध्यक्ष राहुल डंबाळे आणि प्रमुख नेते डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी आज येथे केली. या संदर्भातील अधिकृत पत्र माननीय मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि पुणे जिल्हाधिकारी यांना पाठवण्यात आले आहे. पत्रकात नेत्यांनी म्हटले आहे की, या राष्ट्रीय स्मारकासाठी समित्यांच्या माध्यमातून सातत्याने तीव्र संघर्ष आणि पाठपुरावा करण्यात आला होता. याच आंदोलनांच्या रेट्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी २०२१ मध्ये सुमारे ९८ कोटी रुपयांचा बृहत् विकास आराखडा (DPR) मंजूर करून शासनाकडे पाठवला होता.